

# जनावरांतील सर्रा रोगाचे नियंत्रण

जनावरांमध्ये परोपजीवींमुळे विविध आजार होतात. बाह्यपरोपजींवीच्या प्रादुर्भावामुळे होणाऱ्या आजारांमुळे पशुपालकाचे फार आर्थिक नुकसान होते. या आजारांमुळे दुधाळ जनावरांची उत्पादनक्षमता कमी होते. बाह्यपरोपजीवींमुळे सर्रा हा देखील एक आजार जनावरांना होतो.

चावणाऱ्या माश्यांपासून 'सर्रा' रोगप्रसार होतो. ट्रिपॅनोसोमा इव्हानसाय या आदिजीवामुळे सर्रा रोगाची लागण होते. या रोगात भरपूर ताप येतो, रक्तक्षय होतो आणि जनावर वरचेवर प्रशक्त होत जाते. याचा प्रसार चावणाऱ्या माश्यांपासून (टॅबॅनस, स्टोमोक्सिस इ.) होतो. पावसाळा ऋतू माश्यांच्या वाढीसाठी पोषक असल्यामुळे याचा प्रादुर्भाव पावसाळा किंवा पावसाळ्याच्या शेवटी जास्त दिसून येतो. कळपातील एखादे जनावर या रोगाने बाधित झाल्यास त्यापासून इतर जनावरांस कळपात रोगप्रसार होण्याची जास्त शक्यता असते. माश्यांनी जनावरांचा चावा घेतल्यास याचे जंतू शरीरात जातात आणि रक्तात या आदिजीवाची झपाट्याने वाढ होते. हे आदिजीव शरीरातील शर्करा (ग्लुकोज) मोठ्या प्रमाणात शोषतात. शरीरातील ग्लुकोजचे प्रमाण कमी झाल्यांमुळे जनावरास चक्कर येते, रक्तक्षय होतो आणि जनावरांनी कितीही चारा खाल्ला तरी वरचेवर खंगत जाते. वेळीच उपचार न झाल्यास जनावर दगावते.

**रोगाची लक्षणे :**

- भरपूर ताप येणे, ताप कमी-जास्त होणे, अशक्तपणा येणे, रक्तक्षय होणे, डोळ्यांतून पाणी येणे.
- तीव्र स्वरूपाच्या आजारात शरीरातील ग्लुकोजचे प्रमाण कमी झाल्यामुळे मेंदूवरील नियंत्रण कमी होते. जनावरांत अडखळत चालणे, झाडाला, भिंतीला डोके आपटणे, चक्कर येणे, जनावरास एक किंवा दोन्ही डोळ्यांनी न दिसणे अशी लक्षणे दिसून येतात.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

- रोगाच्या उपचारासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावे. ताप कमी करणारी, रक्ताचे प्रमाण वाढवणारी औषधे पशुवैद्यकाच्या सल्ल्याने द्यावी.
- सर्राचा या रोगाचा प्रसार करणाऱ्या माश्या या काही मिनिटांकरिताच जनावरांच्या शरीरावर बसून रक्त शोषतात आणि उडून जातात. त्यामुळे माश्यांचे नियंत्रण करणे अवघड जाते. माशांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून गोठा स्वच्छ, हवेशीर ठेवावा. गोठ्यातील मलमूत्राचा योग्य निचरा करावा.
- गोठ्याच्या आजूबाजूला झाडाझुडपांची गर्दी करू नये. कारण दाट झाडाझुडपांत माशांची वाढ चांगली होते. आजुबाजूला पाणी सांडू नये याची दक्षता घ्यावी.
- जनावरांची एकत्र जास्तीची गर्दी करू नये. गर्दीमुळे चावणाऱ्या माश्या एका जनावरापासून दुसऱ्या जनावरास लवकर रोग प्रसार करतात.
- जनावरास जखम झाल्यास त्यावर लवकर उपचार करावा. जखमेमुळे माश्या जास्त आकर्षित होतात. त्वरीत जखमेवर उपचार करावे.
- जनावरांचा गोठा, तसेच खताचा खड्डा गोठ्याच्या बाजूची झुडपे यावर महिन्यातून दोनदा शिफारशीत कीटकनाशके फवारावीत.
- गोठा व्यवस्थापन स्वच्छतेला प्राधान्य द्यावे.


**प्रकाशन**

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**

www.mafsu.in

**✲ मार्गदर्शक ✲**

www.knpcvs.in



**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**✲ संकलन ✲**

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.**